पुणे महानगरपालिका
पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था
नागरिकांची सनद (Citizen Charter)

| क्र. | कामाचे स्वरूप | |
|---|---|---|
| १ | **नागरिकांशी संबंधित कामे :-** | पुणे शहर एड्स नियंत्रण संस्थेकडील सर्व सेवा **सर्वांसाठी मोफत** आहेत.<br><br>**नागरिकांशी संबंधित कामे :-**<br>१) संशयीत व एच आय व्ही ची बाधा होण्याचा जास्त धोका असणा-या व्यक्तींसाठी समुपदेशन करणे. एचआयव्ही बाबत नागरिकांना माहिती देणे, एचआयव्ही विषयी शंका असणा-या व्यक्तींच्या त्वरीत रक्तचाचणीची व्यवस्था करणे.<br>२) सर्व गर्भवती स्त्रीयांची पुणे मनपा रुग्णालयातून नोंदणी करून त्यांचे मोफत समुपदेशन करणे व त्यांची तसेच आढळून येणा-या एचआयव्ही बाधित गर्भवतींची तपासणी, उपचार, व त्यांच्या बाळासाठी उपचार.<br>३) एचआयव्ही बाधित गर्भवतींना प्रसुतीपूर्व अे आर टी उपचार व त्याद्वारा बाळाचे एचआयव्ही पासून संरक्षण करणेसाठी प्रसुतीनंतर उपचार.<br>४) एचआयव्ही बाधित गर्भवतींची रुग्णालय प्रसुतीसाठी विशेष प्रयत्न.<br>५) पुणे मनपा सर्व रुग्णालयातून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई व पुणे मनपाच्या संयुक्त प्रयत्नातून २४ तास एचआयव्ही रक्तचाचणीची सुविधा.<br>६) पुणे मनपाच्या स्व. भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय, येरवडा, पर्णकुटी चौक, नगर रोड, येथे सकाळी ९ ते ४ या वेळेत एन्टी रेट्रो व्हायरल उपचार पद्धतीची मोफत सोय. रुग्णांसाठी मोफत चाचण्या, उपचार, माहिती साहित्य, अे आर टी औषधे, समुपदेशन, वैद्यकीय सल्ला, व तज्ञ सेवा, इ. ची सोय.<br>७) शहरातील नागरिकांसाठी मोफत माहिती साहित्याचे वाटप.<br>८) पुणे मनपाची सर्व रुग्णालये व मोफत एकात्मिक समुपदेशन व रक्तचाचणी केंद्रातून एचआयव्ही बाबत माहिती व सल्ला.<br>९) युवकांसाठी सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळांतून एचआयव्ही बाबत माहिती.<br>१०) महाविद्यालयीन युवकांसाठी एन एस एस च्या माध्यमातून माहिती साहित्य पुरवठा.<br>११) पुणे मनपा रुग्णालयांतून परिसरातील युवक, युवती, व किशोर वयीन गटासाठी कार्यक्रम.<br>१२) शहरातून संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगतगुरू तुकाराम महाराज पालखी, सार्व गणशोत्सव, विर्सजन मिरवणूक, नवरात्री, जागतिक एड्स दिन, या निमित्ताने प्रदर्शन ट्रकद्वारा जनजागृती, माहिती साहित्य वाटप, गणेश मंडळ व्यासपीठावरून नागरिकांना एचआयव्ही बाबत माहिती, सार्वजनिक ठिकाणी |

| | | |
|---|---|---|
| | | पोस्टर प्रदर्शनाचे आयोजनाद्वारा एचआयव्ही बाबत संदेश.<br>१३) स्वयंसेवी संस्थांना तांत्रिक मार्गदर्शन, माहिती साहित्याचे वाटप, त्यांच्या नागरिकांसाठीच्या कार्यक्रमात सहभाग व मदत.<br>१४) सामान्य नागरिकांसाठी स्वयंसेवी संस्थांच्या आरोग्य केंद्रांना एचआयव्ही विषयी सामान्य तसेच संधीसाधू आजारावरील औषधे मोफत उपचारासाठी पुणे मनपा सेंट्रल मेडिकल स्टोअर कडून वाटप.<br>१५) स्वयंसेवी संस्थांकडील रुग्णांना व्यवस्थित उपचारांसाठी व तपासणीसाठी प्रमुख रुग्णालयांतून सेवा.<br>१६) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीच्या पुणे मनपा रुग्णालयाकडील फॅसिलिटी इंटिग्रेटेड समुपदेशन व रक्तचाचणी केंद्रांसाठी महाराष्ट्र शासनाकडून मिळणारे एचआयव्ही टेस्ट किटस व इतर साहित्य यांचा केंद्रांना प्रत्यक्ष पुरवठा.<br>१७) पुणे शहरात रुग्णांच्या सोयीसाठी नॅको, भारत सरकारच्या मदतीने नवीन मदत व उपचार केंद्र सुरू करणे.<br>१८) शहरातील मनपा, शासकीय, खाजगी रुग्णालये, एन. जी. ओ. यांचेशी एड्स नियंत्रण कार्यक्रमाबाबत समन्वय करणे.<br>१९) एच आय व्ही बाधित रुग्णांना उपचारांसाठी सहाय करणे.<br>२०) एचआयव्ही बाबत काम करणा-या फॅसिलिटी इंटिग्रेटेड समुपदेशन व रक्तचाचणी केंद्र, मोफत समुपदेशन व रक्तचाचणी केंद्र, अे आर टी उपचार केंद्र, यांना त्यांच्या तांत्रिक अडचणीत मदत करणे.<br>२१) प्रसिद्धी माध्यमांद्वारा एड्स नियंत्रण कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहचविणे.<br>२२) नागरिकांना समक्ष कार्यक्रमातून दूरध्वनी वा मनपा आरोग्य केंद्रातून त्यांच्या आरोग्य प्रश्नांविषयी माहिती देणे.<br>२३) एच आय व्ही बाधित रुग्णांना क्षयरोगासाठी तपासणी व उपचारासाठी मनपा आरोग्य केंद्राद्वारा संदर्भ सेवा पुरविणे.<br>२४) एचआयव्ही विषयी अद्ययावत माहिती उपलब्ध करणे.<br>२५) विविध लक्षगट वर्गासाठी प्रशिक्षण, व मेळावे यांचे आयोजन करणे.<br>२६) शहरातील लॉजेस मधून निरोध वापर वाढविणेबाबत त्यांचेशी संपर्क, तसेच केशकर्तनालयाद्वारा स्वच्छ उपकरणांचा वापर करून एचआयव्ही चा प्रसार रोखणे विषयी प्रयत्न.<br>२७) मनपा रुग्णालयांकडे नागरिकांच्या सोयीसाठी सेवकांची नेमणूक करणे. व त्यांच्या अडचणीत मदत करणे.<br>२८) मनपा, महाराष्ट्र शासन, भारत सरकार, इ. संस्थांना कामाचा मासिक अहवाल, आकडेवारी, उपलब्ध करणे.<br>२९) शहरातील एचआयव्ही बाधित रुग्णांचा फॉलोअप घेणेसाठी ससून रुग्णालयाकडे सेवकांची नेमणूक व त्याद्वारा उपचाराबाबत संदर्भ सेवा. |

| | | |
|---|---|---|
| | | ३०) गुप्तरोग उपचार केंद्राची व्यवस्था व तांत्रिक मदत.<br>३१) पुणे शहरातील एड्स नियंत्रण कार्यक्रम मॉनिटरींग करणे. व विविध संस्थांशी समन्वय करणे. |
| २ | **अ) कामासाठी लागणा-या कागदपत्रांची यादी :-** | **I) सोसायटीकडील उपलब्ध सेवांबाबत –**<br>१) साहित्याचा प्रकार, नग / संख्या, यासह संस्थेच्या छापील पत्रावर लेखी मागणी.<br>२) आयईसी साहित्य, पोस्टर्स सेट, बाबत वरील प्रमाणे लेखी पत्र.<br>३) रिसोर्स पर्सन, कार्यक्रमाचे आयोजन, इ. बाबत पूर्व सूचनेप्रमाणे लेखी पत्र.<br>४) सोसायटीच्या तयार नमुन्यात मागणी पत्र, त्याचबरोबर यापूर्वी पुणे महानगरपालिकेकडून मिळालेल्या औषधांचे डेड स्टॉक रजिस्टर, व औषध वापराबाबत स्टेटमेंट.<br>५) पुणे महानगरपालिकेकडील उपलब्ध झालेली औषधे गरीब व गरजू रुग्णांना मोफत दिली जाणार असलेबाबत हमी.<br>**६) स्वयंसेवी संस्थांकरीता पुणे शहर एड्स नियंत्रण संस्थेकडून कार्यक्रम, आयईसी, व इतर तांत्रिक मदतीसाठी –**<br>अ) स्वयंसेवी संस्थेच्या लेटर हेडवर संस्थांप्रमुखांच्या सहीचे पत्र.<br>ब) संस्थेची संपूर्ण माहिती, नेमणूकीस असलेले सभासद, व पदाधिकारी, सेवक वर्ग, मागील ३ वर्षाचा ताळेबंद, मा. धर्मादाय आयुक्त, यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचा पत्ता, दूरध्वनी, मोबाईल, इ. माहिती, कार्यक्षेत्र, कोणत्या गटासाठी काम करीत आहे किंवा करणार आहे याबाबत माहिती, संस्थेचे शासकीय अनुदान मिळत असल्यास तशी माहिती, शासनाकडील लक्षगट हस्तक्षेप प्रकल्पात सहभागी असलेबाबत निवेदन, शासनाकडून मिळणा-या मदतीबाबत माहिती, प्रशिक्षित सेवक वर्गाची माहिती, यापूर्वी केलेल्या कामाची माहिती व आकडेवारी, इ.<br>क) एड्स विषयक कामाचा अनुभव<br>ड) सामाजिक संस्था, शासकीय, निम शासकीय संस्था, यांचेकडे केलेल्या कामाबाबत त्यांचे शिफारस पत्र.<br>इ) रुग्णालयाकडील एफआयसीटीसी करीता रुग्णालयाचे मा. वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, मेडिकल सुपरीटेंन्ड, यापैकी उपलबध अधिका-याच्या स्वाक्षरीचे मागणीपत्र. आवश्यक संख्या, पूर्वीच्या किटसचा वापर, कंपनीचे नाव, इ. सह.<br>फ) एफआयसीटीसी करीता रजिस्टर्स, स्टेशनरी, फॉर्मस, इ. साठी मा. वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, मेडिकल सुपरीटेंन्ड, यापैकी उपलबध अधिका-याच्या स्वाक्षरीचे मागणीपत्र. |

| | | |
|---|---|---|
| | | **II) नागरिकांसाठी –**<br>१. को-या पानावर सोप्या भाषेत व विषयाशी संबंधित मागणी करणारे अर्ज सादर करणे.<br>२. पुणे महानगरपालिकेच्या पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीकडील उपलब्ध सेवा प्राप्त करणेसाठी तसेच कोणत्याही प्रकारचे अर्ज करणेसाठी तिकिट / रोख फी, अगर कोणतीही मोबदला आवश्यक नाही.<br>३. अर्ज करताना विचारलेल्या माहितीबाबत स्पष्ट उल्लेख आसावा.<br>४. पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीच्या सहकार्यातून संस्था / व्यक्ती यांच्या एड्स विषयक आयोजित कार्यक्रमांसाठी तांत्रिक मदत मिळणेकरीता कार्यक्रमापूर्वी १० दिवस अगोदर लेखी पत्राद्वारे खात्री करणे. त्यामध्ये कार्यक्रमाचे स्वरूप, ठिकाण, उपलब्ध गट, व संस्थेकडील उपलब्ध सुविधा, याबाबत माहिती.<br>५. पुणे शहर एड्स नियंत्रण सोसासटीच्याकडून दिल्या जाणा-या आयोजन, प्रदर्शन, रिसोर्स पर्सन, आयईसी, व इतर सेवांसाठी सेवाशुल्क नाही.<br><br>**ब) कामासाठी लागणारा कालावधी ठरविणे :-**<br>१) प्राधान्य<br>२) कामाचे स्वरूप<br>३) तातडीची गरज<br>४) पूर्ततेसाठी करावयाच्या कार्यप्रणाली<br>५) निरनिराळया स्थरांवरील मान्यता, शिफारस वा तपासण्या<br>६) आवश्यक कागद पत्रे, आकडेवारीची उपलब्धता<br>७) मार्गदर्शक तत्वे<br>८) निरनिराळया समित्यांची शिफारस / मान्यता<br>९) प्रशासकीय अधिकारी यांची शिफारस / मान्यता<br>१०) विविध स्थरांवरील अधिकारी वर्गाच्या प्रकरणाबाबत निर्माण होणा-या शंका, आक्षेप, दुरूस्ती, वा प्रकरणातील सुचित केलेले आवश्यक बदल, इ.<br><br>**क) कामाची कार्यपद्वती सोपी करणे :-**<br>१) कामाचा वेळ वाचविणेसाठी ऑनलाईन पद्धतीचा उपयोग करणे<br>२) कोणत्याही कामाबाबत त्वरीत निर्णय घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करणे<br>३) प्रकरणाबरोबर क मीत कमी आवश्यक कागद पत्रे ठेवणे<br>४) नेमक्या स्वरूपात मागणीपत्र /अर्ज / प्रकरण सादर करणे<br>५) कार्यप्रणालीच्या प्रत्येक टप्प्यावर वैयक्तीक लक्ष देवून तेथील अडचणी त्वरीत दूर करणे.<br>६) सर्व प्रकरणे नियमानुसार विशिष्ट नमुन्यात व आवश्यक गोष्टींची पूर्तता करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ७) कामाची सोपी व सुटसटीत पद्धत वापरणे.<br>८) वैयक्तीक लक्ष देवून प्रकरणांचा पाठपुरावा करणे.<br>९) नगरिक / संस्था यांच्या प्रकरणांवर त्वरीत निर्णय घेणे.<br>१०) सुलभ व सोप्या कार्यपद्धतीचा वापर करून प्रश्नांची सोडवणूक करणे.<br>११) पुढे आवश्यक ठरणा-या वस्तूंची पूर्व तयारी करून ठेवणे.<br>१२) माहिती व तंत्रज्ञान याचे ज्ञान असणा-या सेवकांची नेमणूक करणे.<br>१३) प्रश्नांची त्वरीत सोडवणूक करणेसाठी अनुभवी व कामाची आवड असणा-या सेवाभावी सेवकांची नेमणूक करणे.<br>१४) कमीत कमी वेळेत काम पूर्ण करणे व केलेल्या कामाचा आढावा घेणे.<br>१५) वैयक्तीक सहभागातून कार्य पूर्ण करणे. |

पुणे महानगरपालिका

पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था

गाडीखाना

जा. क्र.

दि. १५/१०/२०१५

प्रति,

मा. आरोग्य अधिकारी,

पुणे महानगरपालिका.

यांजकडेस सविनय सादर

विषय :- पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीची नागरीकांची सनदबाबत माहिती. (Citizen Charter).

संदर्भ : - आरोग्य कार्यालयाकडील पत्र क्र .एचओ/३१२३, दि. २८/०९/२०१५.

महोदय,

वरील संदर्भाप्रमाणे पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीकडील नागरीकांची सनद (Citizen Charter) विषयाची अद्ययावत माहिती आपले अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे .

मा. स. कळावे

आपला विश्वासू

डॉ. राजीव बांबळे

एड्स नोडल अधिकारी

सोबत सीडी पाठवित आहे.

प्रत माहितीसाठी :-

मा. उपआरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका.

मा. विभाग प्रमुख, सांख्यिकी व संगणक विभाग, पुणे महानगरपालिका.